| MHSN080002842025 | **फौ.कि.अर्ज क्र.३७/२०२५**<br>**भाग्यश्री बासरगाव .........अर्जदार**<br>**विरुध्द**<br>**चिदानंद बासरगाव वगैरे .........जाबदार** |
|---|---|
| **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जत, जि.सांगली यांचे न्यायालयात** | |

## निशाणी क्र.५ वरील आदेश
## (घोषित दिनांक ०७.०३.२०२६)

अर्जदार यांनी जाबदार यांचे विरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

### अर्जदाराचे थोडक्यात कथन –

२. अर्जदार यांनी जाबदार यांच्या विरुध्द कौ.हिं.म.सं.कायद्याचे कलम १२,१८,१९,२० व २२ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचे लग्न दिनांक ३०.०४.२०१५ रोजी मौजे उटगी, ता. जत येथे झाले. उभयतांना धनुष्य व दर्शन अशी दोन मुले आहेत. जाबदार क्र.२ हे अर्जदार हिचे सासरे व जाबदार क्र.३ ही सासू आहे तर जाबदार क्र.४ व ५ या नणंद आहेत. जाबदार क्र.६ हे जाबदार क्र.४ चे पती आहेत. अर्जदार व जाबदार क्र.१ यांचे पती पत्नीचे नाते आज देखील अस्तित्वात आहे. लग्नानंतर अर्जदार या जाबदार क्र.१ यांचेकडे नांदणेस गेल्या. त्यांनी केवळ ६ महिने अर्जदार हिस व्यवस्थित नांदवले. त्यानंतर मात्र छळ करण्यास सुरुवात केली. जाबदार क्र.२ व ३ हे अर्जदारांना टोमणे मारणे, शिवीगाळ करणे अशी कृत्ये करत होते. जाबदार क्र.१ हे देखील अर्जदार यांना मारहाण करणे, लहान कारणावरुन भांडण करणे, फोनवर सारखे बोलणे, रात्री उशिरा मोबाईलवर चॅटींग करणे अशी कृत्ये करत होते. अर्जदार हिस

झालेल्या मारहाणीबाबत तिने माहेरी आपल्या आई वडीलांना व पंचांना सांगितल्यानंतर त्यांच्याकडून जाबदार यांना समजावून सांगण्यात आले. त्यानंतर जाबदार हे अर्जदाराशी व्यवस्थित वागू लागले. त्यानंतर मात्र पुन्हा पहिल्यासारखा त्रास देणे चालूच ठेवले. जाबदार क्र.४ व ५ हे सणाकरिता उटगी येथे येत असत. त्यावेळी ते अर्जदारास टोमणे देत असत. त्याचबरोबर ते शिवीगाळ व मारहाण करत असत. अर्जदार हिच्या पहिल्या गरोदरपणात जाबदार क्र.२ व ३ यांनी अर्जदारास शेत तलाव स्वच्छ करण्यास सांगून तिला ओझे उचलण्यास तसेच न झेपणारी कामे करावयास लावली. परिणामी, अर्जदार हिच्या पोटात दुखू लागले. त्यामुळे, अर्जदार हिने जाबदार क्र.१ यांना दवाखान्यात नेण्याची विनंती केली. तथापी, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना दवाखान्यात न नेता माहेरी मुचंडी येथे आणून सोडले. उभयतांना धनुष्य नावाचा मुलगा दिनांक १३.१०.२०१६ रोजी जन्मास आला. जाबदार क्र.१ हे अर्जदार व मुलगा धनुष्य यांचेकडे लक्ष देत नव्हते. मुलगा आजारी पडल्यास त्याचे दवाखान्याकरिता अर्जदार हिला नातेवाईक व जाबदार क्र.३ यांच्या बहिणीकडून पैसे घ्यावे लागत होते. उसने घेतलेले पैसे परत देण्याकरिता जाबदार क्र.१ यांना सांगितले असता ते अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण करत होते. जे.सी.बी. च्या कामातून मिळालेले पैसे जाबदार क्र.१ हे मदयपान करणेकरिता व परस्त्रीसाठी खर्च करत होते.

३. दरम्यानच्या काळात अर्जदार यांना दिनांक २७.०७.२०१८ रोजी दर्शन नावाचा मुलगा झाला. त्यानंतर अर्जदार व जाबदार क्र.१ हे उटगी येथील शेतातून गावात विभक्त राहू लागले. त्यावेळी जाबदार क्र.१ हे अर्जदारास दुसऱ्याच्या शेतात कामासाठी पाठवत असत. कामास जावून आल्यानंतर अर्जदार यांना जाबदार क्र.१ हे फोनवरुन बोलण्याच्या कारणावरुन शिवीगाळ व मारहाण करत होते. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना सलग दोन दिवस घरात मारहाण केली व अर्जदारांना हाकलून दिले. धनुष्य व दर्शन या दोन्ही मुलांना जाबदार क्र.१ यांनी आपल्याकडे ठेवून घेतले. अर्जदार हे तिच्या

मैत्रीणीकडे गेली असता जाबदार क्र.१ यांनी अर्जदार विरुध्द बेपत्ता तक्रार उमदी पोलीस ठाणे येथे दिली. उमदी पोलीसांनी अर्जदार यांना व्यवस्थित वागणूक देणेबाबत जाबदार क्र.१ यांना सांगितले. तथापी, जाबदार क्र.१ यांनी नांदविणेस नकार दिला. त्यानंतर दिनांक १७.०६.२०२४ रोजी अर्जदार यांचे आई वडील व गावातील पंच, नातेवाईक यांनी जाबदार कडे जावून अर्जदार हिला व्यवस्थित नांदविणेबाबत सांगितले. त्यावेळी देखील जाबदार क्र.१ यांनी स्पष्ट नकार दिला. तेंव्हापासून अर्जदार ही मुचंडी येथे रहात आहे. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार हिची कोणत्याही प्रकारे चौकशी केलेली नाही. मुलगा दर्शन हा नेहमी आजारी असतो. त्याचे ट्रांझाचे ऑपरेशन झाले आहे व तो अर्जदार शिवाय रहात नाही ही बाब जाबदार क्र.१ यांना माहीत असून देखील त्यांनी अर्जदार हिला कोणतेही कारण नसताना घरातून हाकलून दिलेले आहे. जत येथील न्यायालयामध्ये अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जामध्ये अर्जदार व जाबदार क्र.१ यांचेमध्ये तडजोड झाली होती. त्यानंतर देखील अर्जदार हिस जाबदार क.१ यांनी त्रास देणेस सुरुवात केली. त्यामुळे, अर्जदार हिने जाबदार क्र.१, ३ व ६ यांच्या विरुध्द दिनांक ०३.०१.२०२५ रोजी उमदी पोलीस ठाणे येथे एन.सी.आर. दाखल केली.

**४.** अर्जदार हिने पुढे असे कथन केले आहे की, मौजे उटगी येथे जाबदार क्र.१ यांचे नावे ०हे–६६आर बागायत शेत जमीन असून त्यातून तो बागायती पिके घेतो. त्यापासून जाबदार क्र.१ यांना सर्व खर्च वजा जाता ४ ते ५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळते. त्याचबरोबर जाबदार क्र.१ हा जे.सी.बी. ऑपरेटर म्हणून कामास जातो. त्यापासून त्याला प्रतिमाह रुपये २५ ते ३० पगार मिळतो. याशिवाय जाबदार क्र.१ यांचेकडे म्हशी, जर्सी गाई आहेत. त्यापासून त्यांना ५ ते ६ लाख रुपये उत्पन्न मिळते. अशाप्रकारे जाबदार क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून त्यांची पोटगी देण्याची ऐपत आहे. मूळ अर्ज गुणदोषावर निकाली होणेस अवधी लागणार आहे. त्यामुळे, अर्जदार यांनी दरमहा रक्कम रुपये २५,०००/– अंतरिम पोटगी व घरभाडेकरिता प्रतिमाह रुपये ६,०००/–

मिळण्याची विनंती केली आहे.

**जाबदारांचे म्हणणे –**

**५.** जाबदार क्र.१ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जदार सोबत जाबदार क्र.१ यांचा विवाह झाल्याचे मान्य केले आहे. त्याचबरोबर उभयतांना दोन मुले असल्याचे देखील कबूल केले आहे. त्याव्यतिरिक्त अर्जातील इतर सर्व कथने नाकारलेली आहेत. जाबदार यांच्या कथनानुसार, विवाहानंतर अर्जदार ही जाबदार क्र.१ यांचेकडे नांदणेस आली. सुरुवातीचे दोन–तीन महिने अर्जदार ही व्यवस्थित नांदली. त्यानंतर विवाहापुर्वीच्या परिचयाचा गैरफायदा घेवून अर्जदार ही घरातील कामे टाळणे, झोपून राहणे, जाबदार क्र.१ ते ३ यांना उध्दट बोलणे, शिवीगाळ करणे, तासंतास मोबाईलवर चॅटींग करणे, परपुरुषासोबत व्हीडीओ कॉल करुन बोलणे अशी कृत्ये करु लागली. त्याबाबत विचारणा केली असता, अर्जदार ही हातातल्या बांगडया फोडून त्याची काच पाण्यात घालून पिऊ लागली.

**६.** जाबदार यांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार ही घरातील कडी लावून एकटीच आत झोपत असे व जाबदार क्र.१ यांना आत येवू देत नसे. तसेच आत आला तर गळफास लावून घेते अशी धमकी देत होती. अर्जदार ही जाबदार क्र.१ यांना "मला माहेरी सोडून" या असे वारंवार म्हणत असे. तसेच जाबदार क्र.१ व त्यांचे घरातील लोकांना शिवीगाळ करत असे. दिनांक १६.०१.२०२४ रोजी रात्री ११.०० वाजता जाबदार क्र.१ यांना अचानक जाग आली. त्यावेळी अर्जदार घरात आढळून आली नाही. म्हणून तिचा शोध घेतला असता, अर्जदार ही शेजारील व्यक्तीसोबत विवस्त्र अवस्थेत अश्लील चाळे करताना घरामागे मिळून आली. त्यावेळी जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास चांगले वागण्याबाबत समजावून सांगितले.

**७.** जाबदार यांनी पुढे असे कथन केले की, वरील घटनेनंतर अर्जदार ही ५

दिवस कसेबसे राहिली व जाबदार क्र.१ यांचे सोबत भांडण काढून कोणतेही कारण नसताना "मला आत्ताच्या आत्ता माहेरी सोडा, नाहीतर मी विष पिवून मरणार" अशी धमकी दिली. त्यामुळे, जाबदार क्र.१ हे अर्जदार हिला सोडणेकरिता गाडीवरुन घेवून निघाले. त्यावेळी दरीकोणूर येथील सरकारी फॉरेस्टजवळ आले असताना जाबदार क्र.१ यांच्या गाडीमागून अर्जदार ज्या व्यक्तीसोबत दिनांक १६.०१.२०२४ रोजी विवस्त्र अवस्थेत सापडली होती ती व्यक्ती दुसऱ्या गाडीवरुन आली. ती व्यक्ती व अर्जदार यांनी मिळून जाबदार क्र.१ यांना मारहाण केली व ते दोघे निघून गेले. त्यानंतर अर्जदार ही तीन महिने माहेरी राहिली व अर्जदार स्वतःहून तिच्या आई वडीलांसह जाबदार क्र.१ यांचेकडे आले व झालेली चूक कबूल केली. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांनी आपल्या दोन्ही मुलांचा विचार करुन अर्जदार हीस नांदावयास आणले.

८. तथापी अर्जदार ही पुर्वीप्रमाणेच वागू लागली. त्यानंतर अर्जदार ही अन्य लोकांशी चॅटींग करताना मिळून आली. सदरची बाब अर्जदार हिच्या आई वडीलांच्या निदर्शनास आणल्यानंतर त्यांनी "तुमचे तुम्ही बघून घ्या" असे सांगितले. त्यानंतर दिनांक १६.०६.२०२४ रोजी सकाळी ०८.३० वा. जाबदार क्र.१ यांच्या घरातील रुपये २५,०००/– व अर्धा तोळे अंगठी व अर्जदार हिच्या अंगावरील दागिण्यासह जाबदार क्र.१ व मुलांना सोडून अर्जदार बेपत्ता झाली आहे. त्यामुळे, जाबदार क्र.१ यांनी दिनांक १७.०६.२०२४ रोजी उमदी पोलीस ठाणे येथे बेपत्ता झालेबाबत तक्रार दिली. त्यानंतर अर्जदार स्वतः पोलीस ठाणेत हजर झाली व जाबदार क्र.१ यांचेसोबत राहणार नसलेबाबत लिहून दिले. अशाप्रकारे अर्जदार हिने कोणतेही कारण नसताना स्वतःहून जाबदार क्र.१ यांचा त्याग केलेला आहे.

९. जाबदार यांनी पुढे असे कथन केले की, अर्जदार ही जत येथील कोट्टलगी पुस्तकालयात खाजगी नोकरी करीत असून तिला दरमहा रुपये १५,०००/– वेतन

मिळते. सदर रकमेतून अर्जदार हिचा उदरनिर्वाह होत असल्यामुळे वेगळया पोटगीची आवश्यकता अर्जदार हिस नाही. याउलट, अर्जदार हिने दिलेल्या त्रासामुळे जाबदार क्र.१ यांची मनःस्थिती ढासळली आहे आणि त्यामुळे, त्यांना कोणतेही काम होत नाही. जाबदार क्र.१ यांची दोन्ही मुले ही त्यांच्याकडेच असून त्यांचा सर्व खर्च जाबदार क्र.१ हेच पहात आहेत. त्यामुळे, अर्जदार यांचा पोटगीचा अर्ज खर्चासह फेटाळणेची विनंती केली आहे.

**१०.** अर्जदार व जाबदारतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलखाचे अवलोकन केले.

## विचाराधीन मुद्दे व निष्कर्ष

**११.** विचारासाठीचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणासहीत खालीलप्रमाणे देत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार या सिध्द करतात का की, जाबदार यांनी अर्जदारा विरूध्द प्रथम दर्शनी कौटुंबिक हिंसाचार केला? | **होय** |
| २. | अर्जदार या दरमहा रुपये २५,०००/– अंतरिम पोटगी मिळविण्यास पात्र आहेत का? असल्यास किती ? | **अंशतः होय, अंतिम आदेशाप्रमाणे** |
| ३. | अर्जदार या दरमहा रुपये ६,०००/– घरभाडे मिळविण्यास पात्र आहेत का? असल्यास किती ? | **नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ करीता (प्रथम दर्शनी कौटुंबिक हिंसाचार) –

**१२.** अर्जदाराच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, जाबदारांनी अर्जदार यांचा

वेळोवेळी शारीरीक, मानसिक, आर्थिक तसेच शाब्दीक छळ केला आहे. जाबदार क्र.१ यांनी अर्जदारांना आजपर्यंत कोणतेही आर्थिक सहाय्य केलेले नाही. मौजे उटगी येथे जाबदार क्र.१ यांचे नावे ०हे–६६आर बागायत शेत जमीन असून त्यातून तो बागायती पिके घेतो. त्यापासून जाबदार क्र.१ यांना सर्व खर्च वजा जात ४ ते ५ लाख रुपये वार्षिक उत्पन्न मिळते. त्याचबरोबर जाबदार क्र.१ हा जे.सी.बी. ऑपरेटर म्हणून कामास जातो. त्यापासून त्याला प्रतिमाह रुपये २५ ते ३० पगार मिळतो. याशिवाय जाबदार क्र.१ यांचेकडे म्हशी, जर्सी गाई आहेत. त्यापासून त्यांना ५ ते ६ लाख रुपये उत्पन्न मिळते. अशाप्रकारे जाबदार क्र.१ यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून त्यांची पोटगी देण्याची ऐपत आहे. त्यामुळे, अर्जदार यांना अंतरिम पोटगी मंजूर करावी.

**१३.** प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार यांनी अंतरिम पोटगी आदेश मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. कौ.हि.म.संरक्षण कायदा २००५ कलम २३ अन्वये न्यायालयास न्याय व योग्य वाटत असेल व सकृत दर्शनी कौंटुबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही किंवा तशी होण्याची शक्यता असेल तर न्यायालय अंतरीम आदेश पारीत करु शकतात. त्याकरीता कुठलीही बाब पुराव्याआधारे सिध्द करण्याची आवश्यकता नाही. जाबदार क्र.१ व अर्जदार यांच्यामध्ये अद्यापही पती–पत्नी म्हणून नातेसंबंध अस्तित्वात असल्याबाबत वाद दिसून येत नाही. अर्जदार या जाबदार क्र.१ पासून वेगळे आपल्या माहेरी रहात असल्याबाबत देखील वाद दिसून येत नाही. जाबदार यांनी अर्जदाराविरूध्द कौटुंबिक हिंसाचार केला याबाबत प्रथम दर्शनी पुरावा पाहता अर्जदार यांनी त्यांना झालेल्या शारीरीक, मानसिक, लैंगिक, शाब्दीक व आर्थिक छळाबाबत अर्जामध्ये तपशीलवार नमूद केलेले आहे. त्याबाबतचे कथन त्यांनी शपथपत्रावर दिले आहे. अभिलेखावर जाबदार यांनी अर्जदार यांना कोणत्या प्रकारे आर्थिक मदत केली, याबाबत प्रथमदर्शनी कुठलाही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच प्रस्तुत अर्ज प्रलंबित असताना देखील जाबदार क्र.१ यांनी अर्जदारास आर्थिक सहाय्य केल्याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा

अभिलेखावर दाखल केला नाही. अर्जदार यांना उदरर्निवाहाची कुठलीही मदत न करणे हा देखील एक प्रकारचा आर्थिक छळ आहे. त्याचबरोबर अर्जदार हिने फेरीस्त सोबत दाखल केलेल्या एन.सी.आर. च्या प्रतीवरुन अर्जदार हिचा जाबदार यांनी छळ केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वरील सर्व विवेचनावरुन माझे असे ठाम मत आहे की, जाबदार यांनी अर्जदार यांचे विरूध्द कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ करीता (अंतरिम पोटगी आदेशाबाबत) –**

**१४.** अर्जदाराच्या संपत्ती व उत्तर दायित्वाचे शपथपत्रामध्ये अर्जदार हिला स्वतःला कुठलेही उत्पन्न नसल्याचे नमूद केले आहे. तसेच जाबदार क्र.१ हे जे.सी.बी. ऑपरेटर असून त्यांना मासिक २५ ते ३० हजार उत्पन्न मिळत असल्याचे, मौजे उटगी येथील जाबदार क्र.१ यांचे नावे असलेल्या शेत जमिनीपासून वार्षिक ४ ते ५ लाख रुपये मिळत असल्याचे तसेच जनावरापासून रुपये ५ ते ६ लाख वार्षिक उत्पन्न मिळत असल्याचे नमूद केले आहे. तथापी, अर्जदार ही कोट्टलगी पुस्तकालयात काम करत असून तिला दरमहा रुपये १५,०००/– वेतन मिळते असे कथन केलेले आहे. तथापी, त्या पृष्ठयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याउलट, अर्जदार हिने फेरीस्त सोबत दाखल केलेल्या सातबारा उताऱ्याचे अवलोकन केले असता जाबदार क्र.१ यांच्या नावे शेत जमीन असून त्यातून ते ज्वारी, बाजरी, शाळू इत्यादी पिके घेत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, जाबदार क्र.१ हे अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्यास पात्र व समर्थ आहेत असा निष्कर्ष काढता येईल.

**१५.** अर्जदार यांना अंतरिम पोटगी मंजूर करताना, जाबदार क्र.१ यांना हाती मिळत असलेले वेतन, त्यांच्यावर असलेली जबाबदारी, सध्याच्या परिस्थितीत असलेल्या वस्तुंच्या किमती आणि उभयतांचे राहणीमान या सर्व बाबी लक्षात घेता, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रुपये ३,०००/–

देण्याचा आदेश देणे न्यायोचित ठरते. सबब, मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करिताः**

**१६.** अर्जदार हीने जाबदार यांचेकडून राहण्यासाठी घर मिळणेबाबतचा अथवा घरभाडे मिळणेबाबत आदेश होण्याची विनंती केली आहे. तथापी, सदर कथनांच्या पृष्ठयर्थ अर्जदार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्याचबरोबर, अर्जदार ही माहेरी रहात असल्याचे अर्जदार हिचे स्वतःचे कथन आहे. त्यामुळे, अर्जदार हिला राहणेस घर नाही अशी परिस्थिती दिसून येत नाही. सबब, अर्जदार हिची घर मिळण्याची किंवा घरभाडे मिळण्याची मागणी मंजूर करण्याबाबतचा आदेश सबळ पुराव्या अभावी पारित करता येणार नाही. सबब विचाराधीन बाब क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |
| **२.** | जाबदार क्र.१ यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदार यांना दरमहा रक्कम रुपये ३,०००/- (रुपये तीन हजार मात्र) अंतरिम पोटगी प्रस्तुतचा अर्ज दाखल दिनांकापासून मूळ अर्जाच्या निकालापर्यत अथवा अन्य कोणता पुढील आदेश पारीत होईपर्यत द्यावी. |
| **३.** | उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी. |

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.11 15:49:18 +0530

**दिनांकः-०७.०३.२०२६** **(प्रकाश चु. बछले)**

**जत.** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, जत.**

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer. : R.B. Samalewale,
Court. : C.J.J.D. & J.M.F.C., Jath.
Date. : 07.03.2026
Order signed by
the Presiding Officer on. : 10.03.2026
Order uploaded on. : 11.03.2026